जा.क्र.पोसआ/ 3944/२०१९
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर
यांचे कार्यालय, दिनांक :- 12 /०४/२०१९

विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे ज्या लोकसभा मतदार संघात राजकीय व्यक्तीं किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत कोणतीही व्यक्ती जे मतदार नाहीत त्यांनी त्या मतदार संघात न थांबणेबाबत.

आदेश,

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ चा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी सदर निवडणुकीसाठी आचारसंहिता दिनांक १०/०३/२०१९ पासुन लागू केली आहे. शिरुर लोकसभा मतदार संघात दिनांक २९/०४/२०१९ रोजी मतदान होणार आहे. पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात ३६ शिरुर लोकसभा मतदार संघात (१ विधानसभा मतदार संघ) समावेश आहे.

निवडणूक आयोग, भारत सरकार यांचेकडील पत्र क्र.४६४/आय.एन.एस.टी./२००७/ पी.एल.एन.-१, दिनांक ०८/०१/२००७ अन्वये प्रचार संपल्यानंतरच्या वेळेपासून मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत राजकीय व्यक्तींवर जर ते त्या मतदार संघाचे मतदार नसतील तर त्या मतदार संघात थांबणेबाबत प्रतिबंध करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सर्व राजकीय व्यक्तींना किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत असलेल्या कोणत्याही व्यक्तींस ते ज्या लोकसभा मतदार संघाचे मतदार नाहीत, त्या लोकसभा मतदार संघात थांबणेस/वास्तव्य करण्यास प्रतिबंध करणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी शिवाजी बोडखे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, शिरुर लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दिनांक २७/०४/२०१९ चे १८.०० वा. पासून ते दिनांक २९/०४/२०१९ चे २४.०० वा. पर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१)सर्व राजकीय व्यक्तीं किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत कोणतीही व्यक्ती ते ज्या लोकसभा मतदार संघाचे मतदार नाहीत, त्या मतदार संघात थांबणेस/वास्तव्य करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.

वरील आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि.१२/०४/२०१९ रोजी दिला आहे.

(शिवाजी बोडखे)
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- १२/०४/२०१९

जा.क्र.पोसआ/ ३७५६/२०१९
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर
यांचे कार्यालय, दिनांक :- १२/०४/२०१९

विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे लोकसभा मतदार संघात राजकीय व्यक्तीं किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत कोणतीही व्यक्ती जे मतदार नाहीत त्यांनी त्या मतदार संघात न थांबणेबाबत.

आदेश,

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ चा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी सदर निवडणुकीसाठी आचारसंहिता दिनांक १०/०३/२०१९ पासुन लागू केली आहे. ३४ पुणे व ३५ बारामती या लोकसभा मतदार संघात दिनांक २३/०४/२०१९ रोजी मतदान होणार आहे. पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात ३४ पुणे लोकसभा मतदार संघात (६ विधानसभा मतदार संघ), ३५ बारामती लोकसभा मतदार संघात (३ विधानसभा मतदार संघ) समावेश आहे.

निवडणूक आयोग, भारत सरकार यांचेकडील पत्र क्र.४६४/आय.एन.एस.टी./२००७/ पी.एल.एन.-१, दिनांक ०८/०१/२००७ अन्वये प्रचार संपल्यानंतरच्या वेळेपासून मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत राजकीय व्यक्तींवर जर ते त्या मतदार संघाचे मतदार नसतील तर त्या मतदार संघात थांबणेबाबत प्रतिबंध करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सर्व राजकीय व्यक्तींना किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत असलेल्या कोणत्याही व्यक्तींस ते ज्या लोकसभा मतदार संघाचे मतदार नाहीत, त्या लोकसभा मतदार संघात थांबणेस/वास्तव्य करण्यास प्रतिबंध करणे जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी शिवाजी बोडखे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, पुणे,बारामती लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दिनांक २१/०४/२०१९ चे १८.०० वा. पासून ते दिनांक २३/०४/२०१९ चे २४.०० वा. पर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१)सर्व राजकीय व्यक्तीं किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत कोणतीही व्यक्ती ते ज्या लोकसभा मतदार संघाचे मतदार नाहीत, त्या मतदार संघात थांबणेस/वास्तव्य करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.

वरील आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि. १२/०४/२०१९ रोजी दिला आहे.

पोलीस सह आयुक्त पुणे शहर

(शिवाजी बोडखे)
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- १२/०४/२०१९

जा.क्र.पोसआ/ ३७५७ /२०१९
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर
यांचे कार्यालय, दिनांक :-१२/०४/२०१९

विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मतदान केंद्राचे १०० मीटर चे परिक्षेत्रातील व्यवसायीक दुकाने व आस्थापना बंद ठेवणे बाबत आदेश.

आदेश,

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ चा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी सदर निवडणुकीसाठी आचारसंहिता दिनांक १०/०३/२०१९ पासुन लागू केली आहे. शिरुर लोकसभा मतदार संघात दिनांक २९/०४/२०१९ रोजी मतदान होणार आहे. पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात शिरुर लोकसभा मतदार संघात एका विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे.

पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात ७१ मतदान केंद्रावर (इमारत) व ४४१ बुथवर दिनांक २९/०४/२०१९ रोजी मतदान होणार आहे. मतदान सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सदर मतदान केंद्रांच्या परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसराच्या जागेचा प्रचारासाठी व इतर कारणांसाठी गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने सदर मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी शिवाजी बोडखे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील ७१ मतदान केंद्र (इमारत) व ४४१ बुथवर १०० मीटर परिसरात दिनांक २९/०४/२०१९ रोजी ००.०१ वा. पासून ते मतदान प्रक्रिया संपेपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१) ७१ मतदान केंद्रांचे (इमारतीचे) १०० मीटर परिसराचे आतील सर्व व्यवसायीक दुकाने, रेस्टॉरन्ट, टप-या, (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना बंद ठेवावेत.

वरील आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दिनांक १२/०४/२०१९ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- १२/०४/२०१९

(शिवाजी बोडखे)
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर

जा.क्र.पोसआ/ ३९५८/२०१९
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर
यांचे कार्यालय, दिनांक :- १२/०४/२०१९

विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मतदान केंद्राचे १०० मीटर चे परिक्षेत्रातील व्यवसायीक दुकाने व आस्थापना बंद ठेवणे बाबत आदेश.

आदेश,

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ चा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी सदर निवडणुकीसाठी आचारसंहिता दिनांक १०/०३/२०१९ पासुन लागू केली आहे. पुणे व बारामती या लोकसभा मतदार संघात दिनांक २३/०४/२०१९ रोजी मतदान होणार आहे. पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात ३४ पुणे लोकसभा मतदार संघात सहा विधानसभा मतदार संघ व ३५ बारामती लोकसभा मतदार संघात तीन विधानसभा मतदार संघांचा समावेश आहे.

पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात ४५२ मतदान केंद्रावर (इमारत) व २५०९ बुथवर दिनांक २३/०४/२०१९ रोजी मतदान होणार आहे. मतदान सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सदर मतदान केंद्रांच्या परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसराच्या जागेचा प्रचारासाठी व इतर कारणांसाठी गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने सदर मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी शिवाजी बोडखे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील ४५२ मतदान केंद्र (इमारत) व २५०९ बुथवर १०० मीटर परिसरात दिनांक २३/०४/२०१९ रोजी ००.०१ वा. पासून ते मतदान प्रक्रिया संपेपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१) ४५२ मतदान केंद्रांचे (इमारतीचे) १०० मीटर परिसराचे आतील सर्व व्यवसायीक दुकाने, रेस्टॉरन्ट, टप-या, (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना बंद ठेवावेत.

वरील आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दिनांक १२/०४/२०१९ रोजी दिला आहे.

पोलीस सह आयुक्त पुणे शहर

(शिवाजी बोडखे)
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- १२/०४/२०१९